महाराष्ट्र शासन
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर.
VILASRAO DESHMUKH GOVERNMENT MEDICAL COLLEGE AND HOSPITAL, LATUR
राजस्थान मारवाडी शाळेजवळ, गांधी चौक, लातूर (महाराष्ट्र) – ४१३५१२
(अधिष्ठाता कार्यालय)

Tel No. (H) -02382-242199
Fax No- 02382-253017

Web site- www.gmclatur.org
E-Mail- dean_gmchl@rediffmail.com

No.VDGMCHL/ Medicine Store/ 3089 /2026

Date-31/07/2026

विषय- अत्यावश्यक औषध खरेदीच्या दरपत्रकांतील अटी व शर्ती मध्ये अंशता बदल करणे बाबत...
संदर्भ – जा.क्र.विदेशावैमवरुला/औभांवि/दरपत्रके/जाहिरात/३०५०/२६ दि.२९.०७.२०२६

उपरोक्त विषयास अनुसरुन या कार्यालयाच्या संदर्भीय पत्रान्वये रुग्णांसाठी लागणारी अत्यावश्यक औषधी खरेदी करण्याकरीता अटि व शर्ती प्रसिध्द करण्यांत आलेल्या होत्या. संदर्भीय पत्रातील अटि व शर्ती कायम ठेवून खालील नमुद केलेल्या वाढीव अटि व शर्तीचा समावेश करण्यांत येत आहे.

०१. एल १ पुरवठादाराने नमुद यादीतील जी अत्यावश्यक औषधे आहेत त्याचा पुरवठा औषध भांडार विभागातून संपर्क साधल्यास किमान २ ते ४ तासाच्या आत करणे आवश्यक आहे. अन्यथा एल २ पुरवठादारांस सदरील पुरवठा करण्याबाबत आदेशीत करण्यात येईल.

०२. या संस्थेस यापुर्वी औषध बाबींचा पुरवठा करण्यांत आलेल्या आदेशाच्या प्रती जोडणाऱ्यास प्राधान्याने विचार करण्यांत येईल.

०३. काळया यादीत नाव नसल्याबाबत रु.५००/- च्या बॉडवर शपथपत्र सादर करावे.

०४. दरपत्रक धारकाने मुंबई व संस्था अधिनियम १९४८ च्या अंतर्गत नोंदणी अद्यावत नोंदणीकरण असल्याचा दाखला/पमाणपत्र जोडावे.

०५. अन्न व औषध प्रशासन यांचे वैद्य प्रमाणपत्र जोडावे.

०६. दरपत्रक धारकाने आधार कार्ड, पॅन क्रमांक प्रमाणपत्राची व जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्राची स्वयंसाक्षांकीत प्रत जोडावी.

०७. दर हे सर्व करासहीत नमुद करावेत. बाजार भावापेक्षा जास्त दर सादर करण्यात येऊ नये. तसेच सर्व औषधी साहित्य स्वता स्वखर्चाने औषधी भांडारात पुरवठा करणे बंधनकारक राहील. तसेच वाहतुक खर्च किंवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही.

०८. दर हे पेनाने लिहिण्यात येऊ नये ते प्रिंट केलेले असावे. हस्ताक्षरात लिहिलेले दरपत्रक रद्य करण्यात येईल. हस्तलिखीत दरपत्रके पुर्वसूचना न देता रद्य करण्यांत येतील.

०९. दरपत्रकाच्या मोहरबंद लिफाफयावर औषधी साहित्याचे दरपत्रक असे नमुद करण्यात यावे. व मोहरबंद लिफाफयावर दुकानाचे नाव संपुर्ण पत्ता मोबाईल नंबर लिहिण्यात यावे.

१०. सद्यस्थितीत संबंधीत लेखाशिर्षामध्ये पुरेशे अनुदान उपलब्ध नसल्यामुळे तसेच या पुर्वीचे देयके संस्थास्तरावर प्रलंबीत असल्यामुळे देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.

११. पुरवठा करण्यांत येणाऱ्या ओपधी बाबी हया वैद्य कालावधीच्या व चांगल्या प्रतीच्या असाव्यात व जवळील मुदतबाहय नसावे. हालक्या किंवा निकृष्ट दर्जाचे असल्यास पुरवठा आदेश रद्य करण्यात येतील व त्याची सर्वस्वी जवाबदारी आपणांवर राहील.

१२. खरेदी प्राधिकाऱ्यावरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेचे एकल दरपत्रक देण्याबाबत दरपत्रक धाकराची हमी असे प्रमाणपत्र सोबत जोडण्यांत यावे.

**<u>हमीपत्राचा नमुना</u>**

१३. मी/आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिकाऱ्या बरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच निविदा सादर केलेली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थामध्ये आम्हाला कोणत्याही प्रकाराचे थेट स्वारस्य नाही.

१४. काही तांत्रिक कारणास्तव दरपत्रके स्विकारणे अथवा कोणत्याही वेळी रद्य करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीतांनी राखुल ठेवला आहे.

१५. सदरील दरपत्रकाबाबत काही तक्रार असल्यास रु.१००००/- (अक्षरी- दहा हजार फक्त) धनादेश मा.अधिष्ठाता यांचे नावे जमा केलयानंतरच तक्रार स्विकारण्यात येईल. आपली तक्रार खरी असल्यास रक्कम परत करण्यांत येईल अन्यथा तक्रार खोटी असल्याचे आढळून आल्यास रक्कम जप्त करण्यांत येईल.

१६. WHO/GMP/COA हे कागदपत्रे गरजेनुसार सादर करणे बंधनकारक असेल.

१७. संदर्भीय यादीतील औषधांची खरेदी हि गरजेनुसार करण्यांत येईल.

१८. उपरोक्त प्रमाणे अटि व शर्ती मान्य असल्यासच दरपत्रके सादर करावेत.

31.07.26

अधिष्ठाता,
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रुग्णालय, लातूर.

प्रति,

अध्यक्ष, संस्थेचे संकेतस्थळ समिती, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर.